7. Pursuant to letter No. F. No. 3(1)/2020-PE-VI, dated 28/01/2021 issued by the Govt. of India, Ministry of Heavy Industries & Public Enterprises, Department of Heavy Industry, New Delhi, communicating the decision regarding closure of the Company along with shutting down all the operations as per DPE Guideline on closure vide OM dated 14/06/2018, the Board of Directors in compliance of the same in their meeting held on 11/02/2021 has decided to proceed with closure of the Company.
In compliance of the above letter, the management had actioned the Assets of the Company (excluding Building & Solar Power System) through MSTC and realisation of the same has been accounted for in the Books. Further, Management of the Company is also in the process to sale the remaining Assets of the Company as per the guidelines at the earliest; in accordance with the same remaining assets have been shifted in a separate disposable group and classified as "Assets Held for Sale."
Accordingly, as per the relevant provisions of Ind AS 105, depreciation on fixed assets has not been charged during the period.
8. Previous period figures have been regrouped / reclassified wherever necessary to confirm to current period classification.

**On behalf of Board of Directors**
**For Scooters India Limited**
**Chairman & Managing Director**
**DIN-09218342**

Place:Lucknow
Date: 12th August, 2022

# RKEC PROJECTS LIMITED

, CIN- L45200AP2005PLLC045795, Registered office 10-12-1 ,3rd floor Rednam Alcazar Redbam Gardens opp SBI main branch, Visakhapatnam 530002.Ph- 0891-2574517, website-www.rkecprojects.com

## EXTRACT OF UNAUDITED STANDALONE & CONSOLIDATED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2022

(Rs. in Lakhs, except per share data)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | Consolidated | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Three Months Ended | | | Year Ended | Three Months Ended | | | Year Ended |
| | | 30-06-2022 Unaudited | 31-03-2022 Audited | 30-06-2021 Unaudited | 31-03-2022 Audited | 30-06-2022 Unaudited | 31-03-2022 Audited | 30-06-2021 Unaudited | 31-03-2022 Audited |
| 1 | Total Income from Operations | 3120.33 | 9943.47 | 3522.96 | 20864.87 | 4648.02 | 9959.9 | 3528.5 | 21071.93 |
| 2 | Net Profit for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 134.6 | -4.38 | 319.47 | 918.57 | 133.81 | 85.73 | 319.7 | 1008.95 |
| 3 | Net Profit for the period (before Tax after Exceptional and/or Extraordinary items) | 134.61 | -4.38 | 319.47 | 918.57 | 133.81 | 85.73 | 319.7 | 1008.95 |
| 4 | Net Profit for the period after Tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 73.08 | -91.18 | 259.76 | 628.34 | 72.48 | -7.68 | 259.93 | 711.89 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Compromising Profit/Loss) for the period (after tax)&Other Comprehensive Income (after tax)] | 73.08 | -91.18 | 259.76 | 628.34 | 72.48 | -7.68 | 259.93 | 711.89 |
| 6 | Equity Share Capital (FV Rs.10 Per share) | 2,399 | 2,399 | 2,399 | 2,399 | 2,399 | 2,399 | 2,399 | 2,399 |
| 7 | Other Equity | | | | 11227.12 | | | | 11310.67 |
| 8 | Earnings per equity share (Face value of Rs.10/- each) | | | | | | | | |
| | -Basic | 0.30 | 0.23 | 1.08 | 2.62 | 0.03 | (0.03) | 1.08 | 2.97 |
| | -Diluted | 0.30 | 0.23 | 1.08 | 2.62 | 0.03 | (0.03) | 1.08 | 2.97 |

Note: a) The above is an extract of the detailed format of Quaterly financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI ( listing and Other Disclouser Requirements) Regulations, 2015. The full format of the Quaterly Financial Results are available on the Company- www.rkecprojects.com and on the Stock Exchange website-www.nseindia.com.

For and on behalf of Board of Directors
G.Radha Krishna, Managing Director


Place : Visakhapatnam
Date: Aug 13, 2022

## ▶ लक्षवेधी

### कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांची तब्येत खालावली

**दिल्ली :** प्रसिद्ध कॉमेडियन राजू श्रीवास्तव यांची हृदयविकारानंतर तब्येत खालावली आहे. व्यायाम करताना हृदयविकाराचा झटका आल्यानंतर राजू श्रीवास्तव यांना दिल्लीतील एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. बुधवारी १० ऑगस्ट रोजी त्यांच्यावर एन्जिओप्लास्टीची शस्त्रक्रिया करण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी श्रीवास्तव कुटुंबाला फोन करून चौकशी केली. राजू श्रीवास्तव यांच्यावर शस्त्रक्रिया केली. त्यानंतरही ते अद्याप बेशुद्धावस्थेत आहेत. त्यांना रुग्णालयातील अतिदक्षता विभागात ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्यांच्या चाहत्यांकडून त्यांच्या तब्येतीत सुधारणा व्हावी म्हणून प्रार्थना केली जात आहे. अशातच पंतप्रधान नरेंद्र मोदींनी राजू श्रीवास्तव यांच्या पत्नी शिखा श्रीवास्तव यांना फोन करून प्रकृतीची चौकशी केली. तसेच मदतीचा हातही पुढे केला आहे.

### भीती सोडल्यास अखंड भारत शक्य : भागवत



**नागपूर :** नऊ हजार वर्षे जुन्या भारतीय संस्कृतीवर वेळोवेळी परकीय आक्रमणे झालीत. आजही जाती, धर्माच्या नावावर समाजात अशांतता पसरविण्याचे प्रयत्न आहेत. आपण भीती सोडल्यास अखंड भारत शक्य आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी रविवारी नागपूर येथे केले. उत्तिष्ठ भारत अंतर्गत 'भारत २०४७ : माय व्हिजन, माय ॲक्शन' या विषयावर सरसंघचालक भागवत यांनी उपस्थित युवकांना संबोधित केले. ते म्हणाले, काही इतिहासकार भारतीय संस्कृती २४०० वर्षे जुनी असल्याचे सांगतात. वास्तविक पाहता आपली संस्कृती नऊ हजार वर्षे जुनी आहे. ते सिद्ध झाले आहे. भविष्यात ही बाब आपल्या पाठ्यपुस्तकांमध्येही येईल. हे परिवर्तन होईस्तोवर प्रतीक्षा न करता प्रत्येक युवकाने भारताला मोठे करण्यासाठी कार्य करायचे आहे. भारत हा ज्ञानसंपन्न आणि संपूर्ण विश्वाच्या अस्तित्वाची एकता मानणारा आहे. हाच विचार प्रत्येक युवकाने अंगिकारत आयुष्यात प्रत्येक कार्य उत्कृष्ट आणि कुशलतेने करायचे आहे. भारत हा अहिंसेचा पुजारी आहे दुर्बलतेचा नाही.

# महाराष्ट्रात खातेवाटप जाहीर; तिजोरीच्या चाव्या फडणवीसांकडे

## १८ मंत्र्यांना खाती, सर्वात जास्त खाती शिंदेंकडे; महत्त्वाची खाती भाजपकडे




**मुंबई :** महाराष्ट्रात एकनाथ शिंदे सरकारमधील १८ मंत्र्यांना अखेर खातेवाटप झाले आहे. या खातेवाटपात भाजपाला महसूल, उच्च व तंत्रशिक्षण अशी महत्त्वाची खाती मिळाली आहेत. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राज्याच्या तिजोरीच्या चाव्या असणार आहेत. त्यांच्याकडे गृह, वित्त व नियोजन, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, गृहनिर्माण अशी महत्त्वाची खाती असतील.

महाराष्ट्राच्या राज्य मंत्रिमंडळाचा पहिल्या टप्प्यातील विस्तारामध्ये भाजपाचे ९ आणि शिंदे गटातील ९ अशा एकूण १८ नेत्यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती. मात्र, अद्याप हे सर्व नेते कोणत्याही खात्याविना मंत्री होते. असे असताना रविवारी खातेवाटप झाले आहे. यातही सर्व महत्त्वाची खाती देवेंद्र फडणवीस यांनी स्वत:कडे ठेवली आहेत. त्यांच्याकडे वित्त व नियोजन, गृहखाते, गृहनिर्माण, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा, राजशिष्टाचार अशी एकूण ८ खाती आहेत.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत:कडे एकूण १४ खाती ठेवली आहेत. यामध्ये सामान्य प्रशासन, नगर विकास, माहिती व तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक प्रकल्प), परिवहन, पणन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन व इतर खाती देण्यात आली आहेत.

### इतर १८ मंत्र्यांची खाती पुढीलप्रमाणे आहेत

- **राधाकृष्ण विखे-पाटील:** महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास
- **सुधीर मुनगंटीवार :** वने, सांस्कृतिक कार्य, व मत्स्य व्यवसाय
- **चंद्रकांत पाटील :** उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य
- **डॉ. विजयकुमार गावित :** आदिवासी विकास
- **गिरीष महाजन :** ग्राम विकास आणि पंचायती राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण
- **गुलाबराव पाटील :** पाणीपुरवठा व स्वच्छता
- **दादा भुसे :** बंदरे व खनिकर्म
- **संजय राठोड :** अन्न व औषध प्रशासन
- **सुरेश खाडे :** कामगार
- **संदीपान भुमरे :** रोजगार हमी योजना व फलोत्पादन
- **उदय सामंत :** उद्योग
- **प्रा.तानाजी सावंत :** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण
- **रवींद्र चव्हाण :** सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण
- **अब्दुल सत्तार :** कृषी
- **दीपक केसरकर :** शालेय शिक्षण व मराठी भाषा
- **अतुल सावे :** सहकार, इतर मागास व बहुजन कल्याण
- **शंभूराज देसाई :** राज्य उत्पादन शुल्क
- **मंगलप्रभात लोढा :** पर्यटन, कौशल्य विकास व उद्योजकता, महिला व बालविकास.


# शिवसंग्राम नेते विनायक मेटे यांचे निधन

## • मुंबई-पुणे महामार्गावर अपघात; आज बीडमध्ये अंत्यसंस्कार



**मुंबई :** शिवसंग्राम पक्षाचे नेते विनायक मेटे यांचे रविवारी पहाटे अपघाती निधन झाले. ते ५२ वर्षांचे होते. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील भाताण बोगद्याजवळ त्यांच्या गाडीचा पहाटे ५.५८ वाजताच्या सुमारास अपघात झाला. त्यांना तत्काळ मदत मिळाली नाही. ते तासभर घटनास्थळीच पडून होते. त्यानंतर सकाळी त्यांना पनवेलमधील एमजीएम रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

या दुर्दैवी घटनेमुळे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी बीडमध्ये अंत्यसंस्कार होणार आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस नेते अशोक चव्हाण, मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह अनेक नेत्यांनी विनायक मेटेंच्या दुर्दैवी निधनावर शोक व्यक्त केला आहे. मेटे हे आपले एक सहकारी आणि बॉडीगार्ड यांच्यासोबत मुंबईच्या दिशेने येत असताना हा अपघात झाला. रविवारी दुपारी १२ वाजता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत मराठा आरक्षणासंदर्भातील बैठकीसाठी ते मुंबईला येत होते.



मेटे यांची अपघातग्रस्त कार

विनायक मेटे यांचे पहाटे निधन झाले. त्यात त्यांच्या डोक्याला मोठी दुखापत झाली होती. त्यांचे निधन घटनास्थळी झाले होते. त्यांना सकाळी ६.२० मिनिटांनी रुग्णालयात आणले असता, त्यांची तपासणी करण्यात आली, तेव्हाच त्यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या गाडीचा ड्रायव्हर आणि एक पोलीस हे देखील या अपघातात गंभीररित्या जखमी झाले आहेत. आमचे डॉक्टर त्यांना उपचार करण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत. त्यांच्या ड्रायव्हरची प्रकृती मात्र चांगली आहे. असे एमजीएम हॉस्पिटल मेडिकल डायरेक्टर कुलदीप सलगोतरा यांनी सांगितले.

मेटेंचा ड्रायव्हर एकनाथ कदम यांनी सांगितले, आम्ही बीडवरून मुंबईला जात होतो. पहाटे ५ च्या सुमारास रस्त्यात एका ट्रकने आम्हाला हुल दिली. या ट्रकच्या बंपरमध्ये आमची कार अडकली. त्याच स्थितीत आमची कार काही अंतरापर्यंत फरफटत गेली. पण मदत पोहोचण्यासाठी तासभर लागला. मी पोलीस नियंत्रण कक्षाला फोन केला. पण, त्यांनी प्रतिसाद दिला नाही. सकाळी ६ च्या सुमारास रुग्णवाहिका आमच्यापर्यंत पोहोचली.

### चौकशीसाठी ड्रायव्हर ताब्यात

दरम्यान, विनायक मेटे यांच्या मृत्यूबद्दल काही नेत्यांनी तसेच शिवसंग्रामच्या कार्यकर्त्यांनी शंका उपस्थित केली आहे. या अपघातात विनायक मेटे यांचा ड्रायव्हर एकनाथ कदम याला किरकोळ जखम झाली आहे. अपघाताबाबत अधिक माहितीसाठी नवी मुंबई पोलिसांनी ड्रायव्हरला ताब्यात घेतले होते. त्याची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून त्याला आता रसायनी (रायगड जिल्हा) पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे. अपघाताबाबत एकनाथ कदम यांच्याकडून सविस्तर माहिती पोलीस घेणार आहेत. यासंबंधी त्याचा जबाब नोंदवून घेतला जाणार आहे. विनायक मेटे यांचा अपघात झाला तेथील सीसी टीव्हीदेखील तपासण्यात येणार आहेत.

# भारताने आक्षेप घेतलेल्या चिनी जहाजाला श्रीलंकेची परवानगी

**कोलंबो :** चीनच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानयुक्त जहाजाला श्रीलंकेच्या हंबनटोटा बंदरात येण्यास भारताने आक्षेप घेतला होता, त्याला तेथे १६ ते २२ ऑगस्टदरम्यान विसावण्यासाठी आता श्रीलंका सरकारने परवानगी दिली आहे.

चीनचे हे संशोधनात्मक जहाज भारताच्या लगतच्या सागरी टप्प्यात थांबविण्याची परवानगी चीनला देऊ नये, असे आवाहन भारताने श्रीलंकेला केले होते. चीनचे हे 'युआन वांग ५' जहाज हे सागरी क्षेपणास्त्रे आणि उपग्रहांचा माग काढणारे आहे. ते ११ ऑगस्ट रोजीच हंबनटोटा बंदरात येऊन तेथे १७ ऑगस्टपर्यंत इंधन भरण्यासाठी थांबणार होते. पण, हे जहाज संरक्षणदृष्ट्या महत्त्वाच्या अशा दक्षिण सागरी प्रदेशात थांबविण्यास भारताने श्रीलंकेकडे आक्षेप घेतला होता. त्यामुळे, नियोजित तारखेला हे जहाज हंबनटोटा बंदरात येऊ शकले नाही. भारताच्या आक्षेपामुळे या जहाजाचा हंबनटोटा बंदरात येण्याचा दौरा लांबणीवर टाकण्याची विनंती श्रीलंकेने गेल्या आठवड्यात चीनला केली होती. पण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या जहाजाला याच बंदरात येण्याची परवानगी श्रीलंकेने दिली आहे.


हंबनटोटा बंदराच्या पूर्वेस सहाशे सागरी मैलांवर थांबलेले हे जहाज श्रीलंका सरकारच्या परवानगीच्या प्रतीक्षेत होते. या बंदराच्या उभारणीसाठी चीनने मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा केला आहे. जहाजाला परवानगी देण्याचे हे प्रकरण श्रीलंका सरकारने योग्यरित्या हाताळले नाही, अशी टीका तेथील विरोधकांनी केली आहे.

# इजिप्तमध्ये चर्चला आग; चेंगराचेंगरीत ४१ जणांचा मृत्यू

**• राजधानी कैरोमध्ये गिझा शहरातील घटना : मृतात ३५ चिमुकल्यांचा समावेश**

**कैरो :** इजिप्तच्या गिझा शहरातील चर्चला लागलेल्या आगीत ४१ जणांचा मृत्यू झाला आहे. या आगीत मृत्यू झालेल्यांमध्ये ३५ लहान मुलांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. चर्चमध्ये प्रार्थनेसाठी ५ हजार लोक उपस्थित होते. इजिप्तची राजधानी असलेल्या कैरोमधील गिझामध्ये रविवारी ही घटना घडली आहे.

इजिप्तची राजधानी कैरोमधील गिझा येथील चर्चमध्ये ५ हजार लोक प्रार्थनेसाठी जमले होते. नेमक्या त्याचवेळी चर्चला आग लागल्याने लोक सैरावैरा पळू लागले. यामुळे चर्चमध्ये चेंगराचेंगरी झाली. त्यात ४१ जणांचा मृत्यू झाला. यामध्ये लहान मुले, चर्चमधील धर्मगुरू आणि नागरिकांचा मृत्यू झाल्याचे समोर येत आहे. या घटनेतील जखमींची संख्या अद्याप समोर आलेली नाही. चर्चला लागलेल्या आगीत मोठे नुकसान झाले आहे.



चर्चची झालेली दूरावस्था.

अबू सेफिन चर्चला शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्याची माहिती आहे. चर्चची इमारत जुनी असल्याने आग मोठ्या प्रमाणात पसरली. आग लागल्याने चर्चमधील नागरिकांनी पळापळ सुरू केली आणि यामुळे चेंगराचेंगली झाली. यामुळे गुदमरून अनेकांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये लहान मुलांची संख्या अधिकअसल्याचे सांगण्यात येत आहे.

चर्चमध्ये लागलेल्या आगीचे नेमके कारण अद्याप समोर आले नाही. स्थानिक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. रविवारी सकाळी ही घटना घडली आहे. अग्निशमन दलाच्या १५ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या व आग विझवण्याचा प्रयत्न करण्यात आला. जखमींना आणि मृत व्यक्तींना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. इजिप्तच्या आरोग्य खात्याने दिलेल्या माहितीनुसार ५५ जण जखमी झाले आहेत. आरोग्य मंत्रालयाचे प्रवक्ते होसाम अब्देल गफर यांनी याबाबत माहिती दिली.

# रोलिंग यांना जीवे मारण्याची धमकी

**न्यूयॉर्क :** लेखक सलमान रश्दी यांच्यावरील हल्ल्यानंतर आता जगप्रसिद्ध लेखिका जे. के. रोलिंग यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. रश्दी यांच्यावर करण्यात आलेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ त्यांनी ट्वीट केले होते. या ट्वीटला उत्तर म्हणून एका ट्विटर युजरने घाबरू नका यानंतर तुमचा नंबर आहे, असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली आहे. जे के रोलिंग यांनी धमकी देणाऱ्या या संदेशाचा स्क्रीनशॉट सोशल मीडियावर शेअर केला आहे. जे. के. रोलिंग हॅरी पॉटर या जगप्रसिद्ध पुस्तकाच्या लेखिका आहेत.



जे. के. रोलिंग यांनी सलमान रश्दी यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करणारे ट्वीट केले होते. तसेच रश्दी लवकरच बरे व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली होती. याच ट्वीटला उत्तर म्हणून एका ट्विटर वापरकर्त्याने घाबरू नका यानंतर तुमचाच नंबर आहे, असे ट्वीट केले. ज्या ट्विटर खात्यावरून रोलिंग यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

**HDFC BANK** We understand your world

**नोंदणीकृत कार्यालय:** एचडीएफसी बँक हाउस, सेनापती बापट मार्ग, लोवर परळ (वेस्ट) मुंबई -400 013 आणि त्याचे एक कार्यालय एचडीएफसी बँक लिमिटेड येथे रिटेल पोर्टफोलिओ व्यवस्थापन म्हणून आहे, पहिला मजला, थिंक टेक्नो कॅम्पस, कंजुमार्ग (पूर्व) मुंबई- 400042

**एचडीएफसी बँक लिमिटेडकडे तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजच्या विक्रीची माहिती आणि सार्वजनिक सूचना.**

एचडीएफसी बँक लि. ("बँक") च्या खाली नमूद केलेल्या कर्जदारांना बँकेकडे तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजच्या विक्रीबाबत, सिक्युरिटीज विरुद्ध कर्ज/ओव्हरड्राफ्ट या स्वरूपाच्या क्रेडिट सुविधांचा लाभ घेण्यासाठी याद्वारे सूचित केले जाते.

कर्जदारांनी मान्य केलेल्या कर्जाच्या अटींनुसार थकबाकीची परतफेड करण्यात सतत चूक केल्यामुळे, खालील कर्ज खाती बकाया स्थितीत आहेत. बँकेने या कर्जदारांना अनेक नोटिस जारी केल्या आहेत, ज्यात खाली नमूद केलेल्या तारखेला अंतिम विक्री सूचनेचा समावेश आहे, ज्याद्वारे बँकेने तारण मागवले होते आणि कर्जदाराला खालील खात्यांमधील संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्यासाठी 7 दिवसांचा वेळ दिला होता, जे अयशस्वी झाले. बँकेला या संदर्भात पुढील सूचना न देता तारण ठेवलेल्या रोख्यांची विक्री करण्यास स्वातंत्र्य असेल.

कर्जदारांनी दुर्लक्ष केले आहे आणि थकीत परतफेड करण्यात अयशस्वी झाले आहे, म्हणून, बँकेने कर्ज करारांतर्गत आपल्या अधिकारांचा वापर करताना तारणधारक म्हणून 22 "ऑगस्ट, 2022 रोजी किंवा नंतर बँकेचे कर्जदारांकडून कर्जाची थकबाकी वसूल करण्यासाठी सिक्युरिटीजची विक्री/विल्हेवाट लावण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जदारांना असेही सूचित केले जाते की, जर कधीही, तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजचे मूल्य शेअर बाजारातील अस्थिरतेमुळे कमी होऊन मार्जिनच्या गरजेमध्ये आणखी कमतरता निर्माण झाली तर बँक तिच्या विवेकबुद्धीनुसार तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजची एक (1) कॅलेंडर दिवस, या संदर्भात कोणतीही सूचना न देता विक्री करेल. तारण ठेवलेल्या सिक्युरिटीजच्या विक्रीतून मिळालेल्या रकमेचे समायोजन केल्यानंतर, कोणत्याही उर्वरित थकबाकीच्या परतफेडीसाठी कर्जदार (चे) बँकेला जबाबदार राहतील.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जदाराचे नाव | 9 ऑगस्ट 2022 प्रमाणे थकबाकी रक्कम | विक्री सूचनेची तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | XXXX0340 | जयप्रकाश सी सरदेसाई | 495,277.94 | 10 ऑगस्ट-22 |

दिनांकित :15.08.2022
ठिकाण : गोवा

सही/-
एचडीएफसी बँक लिमिटेड

## सुप्रभात

**सोमवार दि. १५.०८.२०२२**
१९४४, शुभकृत् संवत्सर, श्रावण मास, कृष्णपक्ष, **तिथी :** चतुर्थी,
**नक्षत्र :** उत्तराभाद्रपदा **दिनविशेष :** संकष्ट चतुर्थी (चं. उ. २१:४४), स्वातंत्र्य दिन

**सूर्योदय** स. ०६:१९
**सूर्यास्त** सं. ०६:५८
**भरती :** दु. ०१:०८, रा. ०१:२८
**ओहोटी :** स. ०६:४०, सं. ०७:३१

## शब्दकोडे २०९९



**आडवे शब्द :**
१) उद्याच्या उद्या ३) एक प्रख्यात ऐतिहासिक गायक ७) ताटातूट ९) खणण्याचे एक अवजार १०) सम्राट १२) टप्पा १३) किंमतीपेक्षा कमी १४) शिजवलेले तांदूळ १५) काठ १७) काव्य २०) तापविणे २२) समज २३) पुण्यातील एक गणपती २५) गणेश २७) वीस दस्त्यांचे पुडके २८) अंकजाल २९) हत्ती ३१) प्रवीण ३२) चांगले (अक्षर वगैरे).

**उभे शब्द :**
१) उत्कृष्ट २) वाफेचा शेक ३) घुसळलेले दही ४) मस्तक झुकवून नमन करणारा ५) पांडवापैकी एक ६) आय ८) कण ११) लहान घण १५) नवा १६) सर्प १८) वस्त्र १९) वंदन २०) कब्जा २१) शहर २४) युद्ध २६)जाणण्याची शक्ती २८)शृंगार २९) भीमाचे आयुध ३०) कलाबूत.

### शब्दकोडे २०९८चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ना | स्ति | क | ■ | च | क्र | वा | क | ■ | दं |
| र | ■ | च | कि | त | ■ | रु | ज | वा | त |
| द | स | रा | ■ | को | क | णी | ■ | फा | ■ |
| ■ | र | ■ | क | र | ■ | ■ | श्री | रा | म |
| ■ | ब | द | ली | ■ | ब | र | व | ■ | ळ |
| तो | त | या | ■ | का | च | ■ | र्ध | ■ | क |
| ह | ■ | ■ | आ | या | त | ■ | न | र | ट |
| म | श | हू | र | ■ | ■ | मो | ■ | ज | ■ |
| त | ■ | र | क्त | ■ | का | र | खा | नी | स |

### [ हाजीपुरात तिरंगा यात्रा]



बिहार राज्यातील हाजीपूरमध्ये ७६ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला लोक ''तिरंगा यात्रेत'' सहभागी झाले. यावेळी नागरिकांनी घेतलेला लांब तिरंगा ध्वज आकर्षण ठरला होता.

# दिल्लीत दोन बांग्लादेशी जेरबंद, पंजाबमध्ये ४ अतिरेक्यांना अटक

**दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी रविवारी २ बांग्लादेशी नागरिकांना ताब्यात घेतले. पोलिसांनी त्यांच्याकडून पासपोर्ट व बांग्लादेशी मंत्रालयांचे १० बोगस स्टॅम्प जप्त केलेत. डीसीपी द्वारका एम. हर्षवर्धन यांनी सांगितले की, पालम भागातून पकडण्यात आलेल्या संशयितांचे नाव मोहम्मद मुस्तफा व मोहम्मद हुसैन आहे.

१५ ऑगस्टपूर्वी गुप्त खबरीच्या आधारावर पोलिसांनी बांग्लादेशी नागरिकांच्या घरी धडा टाकली. यावेळी त्यांच्याकडून १ डझन पासपोर्ट व बांग्लादेशी मंत्रालयाचे १० नकली स्टॅम्प जप्त करण्यात आले. चौकशीत त्यांना याविषयी कोणतेही खास स्पष्टीकरण देता आले नाही. त्यामुळे त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

पंजाबमध्ये आयएसआय पुरस्कृत अतिरेकी मॉड्यूलचा पर्दाफाश करण्यात आला. या प्रकरणी कॅनडा स्थित अर्श डल्ला व ऑस्ट्रेलिया स्थित गुरजंत सिंगशी संबंधित मॉड्यूलच्या ४ सदस्यांना अटक करण्यात आली आहे. पंजाबच्या डीजीपींनी दिलेल्या माहितीनुसार, या आरोपींकडून ३ ग्रेनेड, एक आयईडी, दोन ९ एमएम पिस्तूल व ४० जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.



# 'बिग बुल' राकेश झुनझुनवाला यांचे निधन



**मुंबई :** दलाल स्ट्रीटचे 'बिग बुल' राकेश झुनझुनवाला यांचे रविवारी सकाळी निधन झाले. अवघ्या ५ हजार रुपयांपासून सुमारे ४३.३९ कोटींचा पल्ला गाठणारे झुनझुनवाला ६२ वर्षांचे होते. त्यांनी गत आठवड्यातच 'अकासा' एअरलाइंसच्या माध्यमातून एव्हिएशन सेक्टरमध्ये एंट्री केली होती. त्यानंतर लगेचच ही धक्कादायक बातमी आली आहे. झुनझुनवाला यांनी १९९२ च्या हर्षद मेहता घोटाळ्याचा खुलासा झाल्यानंतर शॉर्ट सेलिंगच्या माध्यमातून मोठा नफा मिळवला होता.

यासंबंधीच्या माहितीनुसार, राकेश झुनझुनवाला प्रदिर्घ काळापासून आजारी होते. त्यांना रविवारी सकाळी ६.४५ च्या सुमारास मुंबईच्या ब्रीज कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तिथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी झुनझुनवाला यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. ते म्हणाले की, राकेश झुनझुनवाला एक दुर्दम्य इच्छाशक्तीचे व्यक्ती होते. जीवनाने परिपूर्ण, विनोदी व अंतर्दृष्टी असलेल्या झुनझुनवालांनी आर्थिक जगतावर आपली अमिट छाप सोडली. भारताच्या प्रगतीसाठी ते कायम उत्सुक असत. त्यामुळे त्यांचे निधन दु:खद आहे. त्यांच्या कुटुंबीय व चाहत्यांप्रती माझ्या संवेदना.

राकेश झुनझुनवाला यांना भारताचे वॉरेन बफेट म्हणूनही ओळखले जात होते. त्यांना भारतीय शेअर बाजारातील 'बिग बुल' म्हटले जात होते. अकासा एअरलाइंसमध्ये राकेश व त्यांच्या पत्नी रेखा यांची सर्वात मोठी गुंतवणूक आहे.

### ब्रीच कँडी रुग्णालयात घेतला अखेरचा श्वास

### कॉलेजचे शिक्षण घेताना शेअर बाजारात प्रवेश

झुनझुनवाला यांनी महाविद्यालयात शिक्षण घेत असतानाच शेअर बाजारात प्रवेश केला होता. त्यांनी इंस्टीट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंटमधून सीएची पदवी घेतली. त्यांचे वडील प्राप्तिकर अधिकारी होते. त्यांच्या माध्यमातूनच त्यांच्या मनात शेअर बाजाराची आवड निर्माण झाली.

## कोअर फूड्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: व्हिजन हाऊस, थिवी इंडस्ट्रीअल इस्टेट, म्हापसा, गोवा ४०३५२६
सीआयएन: एल३३२०८जीए१९८३पीएलसी०००५२० दूरध्वनी: (०८३२) २२५७७२९
ईमेल : companysecretary@korefoods.in | संकेतस्थळ www.korefoods.in

**३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सार्वजनिक सूचना**
**कोअर फूड्स लिमिटेडच्या समभाग धारकांसाठी**
**(फोटोफोन इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेड/फिल कॉर्पोरेशन लिमिटेड म्हणून पूर्वी ओळखले जाणारे)**

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की कोअर फूड्स लिमिटेडची ३९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) मंगळवार, २० सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ११ वाजता प्रत्यक्ष उपस्थिती तसेच व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी) किंवा अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (ओएव्हीएम)च्या माध्यमातून कंपनी कायदा २०१३ आणि सेबी (लिस्टींग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन २०१५ यातील लागू होणाऱ्या तरतुदींप्रमाणे व कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) जारी केलेल्या परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांकित ०८.०४.२०२०, परिपत्रक क्र. १७/२०२० दिनांकित १३.०४.२०२०, परिपत्रक क्र. २०/२०२० दिनांकित ०५.०५.२०२० आणि परिपत्रक क्र. २/२०२२ दिनांकित ०५.०५.२०२२ आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाने (सेबी) जारी केलेल्या परिपत्रक क्र.सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी2/सीआयआर/पी/२०२२/६२ दिनांकित १३.०५.२०२२ सह वाचण्यात येणाऱ्या लागू तरतुदी आणि या संदर्भात जारी केलेल्या इतर लागू परिपत्रकांचे पालन करून, ३९ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या व्यवसायाच्या व्यवहारासाठी होणार आहे.

वरील परिपत्रकांच्या अनुषंगाने वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस आणि आर्थिक वर्ष २०२१-२०२२ दरम्यान वार्षिक अहवाल केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्या सदस्यांना पाठविला जाईल ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी किंवा रजिस्ट्रार अँड ट्रान्सफर एजंट (आरटीए) किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंटस (डीपी) कडे नोंदणीकृत आहेत. २०२१-२०२२ या आर्थिक वर्षासाठी ३९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभा आणि वार्षिक अहवालाची नोटीस कंपनीच्या संकेतस्थळावर www.korefoods.in आणि बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजच्या संकेतस्थळावर www.bseindia.com येथे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ज्या सदस्यांचा ईमेल पत्ता कंपनी किंवा आरटीए किंवा डीपीमध्ये नोंदणीकृत नाही, त्यांना एजीएमची नोटीस, वार्षिक अहवालासह कोणतेही संप्रेषण प्राप्त करण्यासाठी खालील गोष्टी करण्याची विनंती केली जाते.

१. जर सदस्य भौतिक स्वरुपात शेअर्स धारक असतील, तर त्यांनी त्यांचे नाव, फोलिओ क्रमांक, ईमेल पत्ता, पत्ता आणि पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित प्रत कंपनीच्या इमेलवर companysecretary@korefoods.in किंवा कंपनीच्या रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंटच्या पुढील पत्त्यावर नमूद करून त्यांचे ईमेल पत्ते नोंदविण्यात यावे. डेटामॅटिक्स बिझनेस सोल्यूशन्स लिमिटेड, प्लॉट क्र. बी-५, पार्ट बी क्रॉसलेन, एमआयडीसी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३. ईमेल: investorsqry@datamaticsbpm.com

२. डिमॅट स्वरूपातील शेअर्स धारकांनी त्यांचा ईमेल पत्ता त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंटसकडे जेथे त्यांचे डिमॅट खाते ठेवतात तेथे नोंदविण्यात यावा.

३९व्या एजीएमच्या सूचनेनुसार सदस्य व्हीसी/ओएव्हीएम द्वारे किंवा प्रत्यक्ष उपस्थितीद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात.

कंपनी आपल्या सर्व सदस्यांना ३९ व्या एजीएम नोटीसमध्ये निश्चित केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्यासाठी दूरस्थ ई-मतदान आणि ई-मतदान आणि प्रत्यक्ष मतदान सुविधा प्रदान करणार आहे. भौतिक स्वरूपातील शेअर धारक किंवा डीमॅट स्वरुपातील शेअर धारक असलेल्या सदस्यांसाठी किंवा ज्यांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनी/आरटीए/डीपीकडे नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांच्यासाठी ३९ व्या एजीएम दरम्यान दूरस्थ ई-मतदान, ई-मतदान आणि प्रत्यक्ष मतदानाद्वारे मतदान करण्याचे तपशीलवार निर्देश एजीएमच्या ३९ व्या नोटिसमध्ये प्रदान केले जातील.

**केवायसीची नोंदणी**

सेबीने आपल्या दिनांकित ३.११.२०२१ च्या परिपत्रकाद्वारे भौतिक स्वरूपात शेअर्स धारण केलेल्या सदस्यांना पॅन, केवायसी तपशील आणि नामांकन तपशील सादर करणे बंधनकारक केले आहे. भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांनी कंपनीचे आरटीए डेटामॅटिक्स बिझनेस सोल्युशन्स लिमिटेड, प्लॉट नंबर बी-५, पार्ट बी क्रॉसलेन, एमआयडीसी, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३ येथे बँक तपशील आणि नामांकन तपशीलांसह पॅन, केवायसी तपशील सादर करण्याची विनंती केली जात आहे. संबंधित फॉर्म आरटीएच्या www.datamaticsbpm.com या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

कोअर फूड्स लिमिटेडसाठी
सही/-
**पूजा जोशी**
कंपनी सचिव-अधिक-अनुपालन अधिकारी

दिनांकित: १५/०८/२०२२
ठिकाण: म्हापसा, गोवा

**मुद्रक व प्रकाशक** प्रमोद आचार्य यांनी फोमेंतो मीडिया यांच्यातर्फे हे पत्र एलिगंट ऑफसेट, थिवी औद्योगिक वसाहत करासवाडा म्हापसा येथे **मुद्रित** करुन विला फ्लोअर्स दा सिल्वा, इराज्मो कार्व्हालो रस्ता, मडगाव येथे **प्रकाशित** केले.
**संपादक :** पांडुरंग गांवकर (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी) सर्व हक्क सुरक्षित.
**संपादकीय कार्यालय :** तिसरा मजला, फोर्थ इस्टेट (कामत मेट्रोपॉलीस) सांत इनेज, पणजी, गोवा. **वृत्तविभाग :** ०८३२-२४०५९५०, **फॅक्स :** ०८३२-२४०५९५२, **ईमेल :**news.varta@thegoan.net, goanvarta@gmail.com **सावंतवाडी कार्यालय :** सिंधुदुर्ग लाईव्ह, हरिप्रिया अपार्टमेंट, एस.टी. बसस्थानकानजीक, मेन रोड, सावंतवाडी. **संपर्क :** ०२३६३२७२१९१, ९९२२९२८०८१
**सूचना :** संपादकीय वगळता सर्व स्तंभ, वाचकांची पत्रे, लेख ही त्या त्या लेखकांची मते आहेत. दै. गोवन वार्ताचे संपादक, प्रकाशक आणि मालक यांची नव्हे. **वितरण चौकशी :** (०८३२) २४९०४०४, **ईमेल :** circulation@thegoan.net **जाहिरातविषयक चौकशी :** (०८३२) २४०५९८८ **ईमेल :** advertising@thegoan.net